महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या संवर्गातील शासकीय तंत्रनिकेतनांतील अधिव्याख्याता व तत्सम पदांवरील अधिका-यांची दि.१.१.२००६ पर्यंतची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन परिपत्रक क्रमांकःसेवाजे-२००७/(३२२/०७)/तांशि-२

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : ९ जुलै, २००८

संदर्भः १) शासन निर्णय समक्रमांक दि. ८/१/२००८ व १२.२.२००८

२) संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.४ अ/आस्था/अधि.जेसू/२००८/८५१,दि. ५.३.२००८

शासन परिपत्रक :- संदर्भाधिन क्र. १ येथील शासन निर्णयान्वये तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या संवर्गातील शासकीय तंत्रनिकेतनांतील अधिव्याख्याता व तत्सम पदावरील अधिका-यांची दि.१.१.२००६ पर्यंतची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली होती. सदर ज्येष्ठतासूचीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार करुन संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भाधिन क्र. २ येथील पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावानुसार या अधिका-यांची दिनांक १/१/२००६ पर्यंतची ज्येष्ठतासूची अंतिम करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

२. सदरहू शासन परिपत्रकान्वये सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मधील तत्वप्रणालीनुसार महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ या संवर्गातील शासकीय तंत्रनिकेतनांतील अधिव्याख्याता व तत्सम पदांवरील अध्यापकांची दि.१.१.२००६ पर्यंतची विषयनिहाय अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळ www.maharashtra.govt.in वर ठेवण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक 20080709110120001 आहे.

४. सदर दि. १.१.२००६ पर्यंतच्या अंतिम ज्येष्ठतासूचीत अंतर्भूत केलेल्या अध्यापकांची नांवे सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये नमुद करण्यात आलेली आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**( अ. गो. खडपकर )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२) सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.

३) प्राचार्य, सर्व शासकीय तंत्रनिकेतन व संस्था (संचालकांमार्फत)

४) सर्व संबंधित अध्यापक (संचालकांमार्फत)

५) निवडनस्ती / तांशि-२.

# परिशिष्ट-अ

तंत्रशिक्षण संचालनालयातील "महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा गट-अ" या संवर्गातील शासकीय तंत्रनिकेतनांमधील अधिव्याख्याता व तत्सम पदावर कार्यरत असलेल्या अधिका-यांची दि.१.१.२००६ ची अंतिम ज्येष्ठतासूची ज्या तत्वप्रणालीच्या अनुषंगाने तयार करण्यात आलेली आहे ती तत्वप्रणाली :-

१) शासन निर्णय शिक्षण व युवक सेवा विभाग क्र. जीईसी- ४४७८/१५४७०६/(४३४९)/९, दिनांक १७.३.१९८० अन्वये ज्या अध्यापकांनी / अधिका-यांनी महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक सेवा या संवर्गासाठी विकल्प दिला आहे ते वगळता इतर अध्यापकांच्या नावाचा समावेश करण्यात आलेला नाही.

२) शासन निर्णय शिक्षण व युवक सेवा विभाग क्र. सीईटी- १०७७/१३२०९५/(३३७०)/९, दिनांक २.४.१९८० अन्वये ज्या अधिव्याख्यात्यांची श्रेणीवाढ झालेली आहे आणि ज्यांनी महाराष्ट्र अभियांत्रिकी महाविद्यालयीन शिक्षक सेवा या संवर्गासाठी विकल्प दिलेला नाही अथवा त्या सेवेत समाविष्ट होऊ शकले नाहीत अशा अधिका-यांची नावे समाविष्ट करण्यात आलेली आहेत.

३) नामनिर्देशनाद्वारे नियुक्त झालेल्या अधिकाऱ्यांची सेवा ज्येष्ठता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने दिलेल्या पसंतीक्रमानुसार निश्चित करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे ज्या अध्यापकांनी विहीत मुदतीत रुजू होण्यापूर्वी मुदतवाढ मागतिलेली होती आणि शासनाने त्यांना विहीत केलेल्या मुदतीनुसार सेवेत रुजू होण्यास परवानगी दिलेली आहे त्यांची सेवाज्येष्ठता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पसंतीक्रमानुसार निश्चित केलेली आहे.

४) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.: एससीटी-८०९३/७७३-गो/(९२/९३)/तांशि-६, दि. १.१.१९९९ अन्वये शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्याता व तत्सम पदांवरील अधिका-यांची प्रसिध्द केलेली दि.१.१.१९९३ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची विचारात घेऊन दि. १/१/२००६ रोजीची अंतिम ज्येष्ठतासूची (परिशिष्ट-ब) तयार करण्यात आली आहे.

५) ज्या अधिव्याख्यात्यांच्या जात प्रवर्गाची माहिती उपलब्ध झाली अशा अधिव्याख्यात्यांच्या नावासमोर त्यांचा प्रवर्ग नमूद करण्यात आलेला आहे. ज्यांची माहिती उपलब्ध झालेली नाही अशा सर्व अधिव्याख्यात्यांचा प्रवर्ग खुला असा नमूद करण्यात आला आहे. याबाबत संबंधितांकडून जात प्रवर्गाची माहिती प्राप्त झाल्यावर आवश्यक तो बदल ज्येष्ठतासूचीत करण्यात येईल.